झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/ ८९४ /२०२३
दिनांक : १८ /०७ /२०२३

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत अंतिम आदेश)**

<u>प्रस्तावना -</u>

स.नं.११२, गणेश पेठ,पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १२ अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

(२) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ड) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(३) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे गणेश पेठ, स.नं.११२, गणेश पेठ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३१२.५० चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेबाबत प्र.सहायक संचालक नगररचना यांनी दि.२९/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी तथा सक्षम विभाग क्र.१, झो.पु.प्रा., पुणे यांना कळविले आहे; आणि

(४) ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ३१ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र २६ (२३ यादीमधील + ३ यादीबाहय), बिगर निवासी पात्र ० आणि संयुक्त ० या प्रमाणे एकुण २६ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत; आणि

(५) ज्याअर्थी, सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.०२/०६/२०२० रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३-९, २०२० पृष्ठ मध्ये क्र. २-३ तसेच दै.सांज महानगरी व दै.महाराष्ट्र निरोप्या या दैनिक वृत्तपत्रात दि.०४/०९/२०२०

रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१०/०६/२०२० रोजी डकविण्यात आलेला आहे; आणि

(६) ज्याअर्थी, विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था आम्ही आमच्या जबाबदारीवर संक्रमण शिबीरामध्ये (Transit Camp) करणार असलेबाबत रु.५००/- च्या मुंद्रकावरील हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे; आणि

(७) ज्याअर्थी, या विभागामार्फत उपरोक्त मिळकतीवरील झोपडीधारकांना संक्रमण कालावधीकरीता देय भाडे निश्चित करुन मिळणेबाबत तांत्रिक विभागाचे दि.०५/०७/२०२३ रोजीचे पत्रान्वये एका झोपडीधारकास प्रति महिना रक्कम रु.६१३९/- प्रमाणे भाडे देय होईल असे कळविले आहे; आणि

(८) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांनी दि.१३/०४/२०२३ रोजीचे पत्रान्वये "योजना लवकर पुर्ण होण्यासाठी झोपडपट्टीतील सर्व झोपडीधारकांनी आपल्या झोपडया स्वत: पाडुन योजना क्षेत्र रिकामे करुन दिले असलेने या योजनेचा अंतिम झोपडपट्टी निर्मुलन आदेश पारीत करणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अधिनियमातील कलम ३(ड) सह कलम १२ च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करण्या संदर्भातील अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u> :-

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.१४/१२/२०२२ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

**झोपडपट्टीचे नाव : स.नं.११२, गणेश पेठ**
**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.**

## अनुसूची

| स.नं | जमीन/भोगवट दाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमिती पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.११२ | महाराष्ट्र शासन | ३१२.५० चौ.मी. | शेख हॉस्पिटल | न.भु.क्र.१२५ | न.भु.क्र.६५, ६२, ६६, ६७ | न.भु.क्र.१११ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-१८/०७ /२०२३

14.7.23

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरील पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या ०५ प्रती या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती.
४. विकासक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. २४ संकल्प आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे-४ यांना माहितीस्तव.